महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३१८ वा | दिनांक : १८/१०/२०२५ | वार : शनिवार

## उद्धव आणि राज ठाकरे यांनी मुंबईसाठी नेमके काय केले?: आशिष शेलार



**मुंबई** : आम्ही मुंबईचे चौकीदार आहोत. सण-उत्सव साजरे करणे हा आमचा अधिकार आहे. आम्ही भोंगेमुक्त मुंबई करत आहोत, तर उद्धव ठाकरे हिरवी युक्त मुंबई करत आहेत, अशा शब्दांत राज्याचे मंत्री आणि भाजपचे नेते आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. भोंगे मुक्त मुंबई या किरीट सोमय्या यांच्या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी ठाकरे बंधूंवर हिंदुत्व, रझा अकादमी आणि मुंबईतील प्रशासनिक कामगिरी या सर्वच मुद्द्यांवरून सडकून टीका केली.

शेलार म्हणाले की, आम्ही हिंदुत्ववादी असल्याच्या घोषणा शिवाजी पार्कवर केल्या होत्या, पण यांचे हिंदुत्व काँग्रेसच्या टिळक भवनापर्यंत पोहोचताना विरले. भोंगा बंदीच्या घोषणा देणाऱ्यांनी नंतर आपल्या पावलांचा मोर्चा काँग्रेसकडे वळवला. एक भोंगा आहे, नऊ वाजताच, जो रोज तोंडावर आपटतो आणि पुन्हा उभा राहतो. मग हेच लोक हिंदुत्ववादी असल्याच्या घोषणा देतात, पण त्यांची कृती मात्र विरोधाभासी असते.

शेलार म्हणाले की, उद्धव ठाकरे हे आज फोटो आणि ऑनलाइनच्या पलीकडे दिसत नाहीत. मुंबईत जेव्हा बॉम्बस्फोट झाले, तेव्हा जखमींना मदत करण्याचे काम किरीट सोमैया आणि मुंबई भाजपने केले. आम्हाला विचारतात की मुंबईशी आमचा काय संबंध? मग आम्हीही विचारतो, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी मुंबईसाठी नेमके काय केले? मुंबईच्या प्रश्नांवर काम करण्याऐवजी ते केवळ टीका करण्यापुरतेच मर्यादित राहिले आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

मुंबईच्या विकास आणि नामांतराच्या मुद्द्यावरूनही शेलारांनी ठाकरे गटाला टोला लगावला. ईशान्य मुंबईत उड्डाणपुलाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याला विरोध का केला? २५ वर्षे तुमचा महापौर होता, तरी मुंबईतील अनेक भागांची परिस्थिती सुधारली नाही. मालवणी पॅटर्नचे समर्थक कोण होते, हे सगळ्यांना माहीत आहे. मुंबईतील स्थानिक प्रश्नांवर आवाज उठवणे हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही मुंबईचे चौकीदार आहोत, पण काहींना ही भूमिका पचत नाही, असे शेलार म्हणाले.

## कुठे हार्ट काढत बसू नका : कोणी गावले तर टायरमध्येच टाकेल, उपमुख्यमंत्री अजित पवार



**पुणे** : कुठे हार्ट काढत बसू नका, मी कॅमेरे बसवणार आहे. कोणी गावले तर त्याला टायरमध्येच टाकतो, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिला आहे. बारामती येथील सभागृह भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात ते बोलत होते. सुशोभीकरणाच्या मुद्द्यावर बोलताना अजित पवारांनी कुठेही हार्ट काढत बसू नका, कोणी गावले तर टायरमध्येच टाकेल असा इशारा दिला.

अजित पवार या कार्यक्रमात बोलताना म्हणाले, काही जण नावरात्री आली की गोधड्या धुतात आणि वाळायला टाकतात, मी जिथे सुशोभित केले आहे त्यावरच वाळायला टाकतात. तसेच दसऱ्याच्या दिवशी बारामतीमध्ये २३०० चार चाकी गाड्या विकल्या गेल्या आहेत. साहेब (शरद पवार) आमदार होते, तेव्हा १७ हजार मतदार होते. आता १ लाख १० हजार मतदार झाले आहेत. एवढी लोकसंख्या बारामतीमध्ये वाढली आहे. तसेच पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, सुशोभित केलेल्या ठिकाणी कुठे हार्ट काढत बसू नका. आता मी कॅमेरे बसवणार आहे. कोणी गावले तर त्याला टायरमध्येच टाकतो, असा इशारा दिला.

अजित पवारांनी यावेळी बोलताना उपस्थितांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले, मधल्या काळात पावसाने हजेरी लावली. सरासरी सरासरी पेक्षा जास्त पाऊस पडला. १८ आणि १९ ला हवामान खात्याने पाऊस सांगितला आहे. मी विकास करतोय आणि काही लोक तिथे चोऱ्या करण्याचा प्रयत्न करतात. कोणाचे नुकसान झाले तर म्हणतील बघा कसा विकास चालला आहे? बोलायला कोणी हात धरू शकत नाही.

अजित पवार म्हणाले, जो चोरी पकडून देईल त्याला एक लाख रुपये देऊ आणि जो चोरी करेल त्याला दोन लाख दंड करू. पकडून देणाऱ्याला १ लाख, तर एक लाख हे पालिकेला देऊ, असे अजित पवारांनी म्हटले. पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, मी काम करताना जात बघत नाही. काम करण्यासाठी वाळू आणली. त्यातली वाळू काहींनी चोरून नेली. ही जित्राबं बारामतीत कशी? याचा विचार करतोय, यांचा बंदोबस्त करतो, असा देखील इशारा अजित पवारांनी दिला.

यावेळी बोलताना अजित पवारांनी चांगलीच टोलेबाजी केली. ते म्हणाले, मी काम करतोय पण काही लोक माझ्या सोबत नाही. काहींना मी नगराध्यक्ष केले आणि ते आज माझ्या सोबत नाहीत, असे म्हणत त्यांनी शरद पवार गटातील दोन महिलांना टोला लगावला आहे. तसेच आता पाच दिवस सुट्टी आहे, मला आता कागद द्यायचे बंद करा. माझी आणि कागदाची कुठे गाठ पडली, सारखे दादा धरा, दादा धरा.. आचारसंहिता लागेल. त्यामुळे मला राज्यभर फिरावे लागेल, असेही ते यावेळी म्हणाले.

# बीडमध्ये ओबीसी नेत्यांचा महाएल्गार! : छगन भुजबळ यांच्या नेतृत्वात सभा

**बीड** : ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी आज, 17 ऑक्टोबर रोजी बीडमध्ये राज्याच्या समस्त ओबीसी समाजाची एक मोठी महाएल्गार सभा आयोजित करण्यात आली आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वात होणाऱ्या या सभेला राज्यभरातील महत्त्वाचे ओबीसी नेते उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. सभेच्या आधी छगन भुजबळ, धनंजय मुंडे आणि लक्ष्मण हाके यांच्यात हॉटेल सनराईज येथे बैठक झाली.

महाएल्गार सभेत बोलताना छगन भुजबळ म्हणाले, अनेकांना या सभेचे निमंत्रण दिले नाही म्हणून अनेकजण नाराज आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो, अधिकार के लढाई में निमंत्रण नहीं भेजा करते. जिनका जमीर जिंदा हें, वो खुद समर्थन में आजाते हें. हमारे हक पर जहा आच आये तो टकराना जरूरी हें. मी तुम्हाला सांगू इच्छितो आपल्या सभेत काही लोक घुसवले जाण्याची शक्यता आहे. मी असेही ऐकले की काही लोक सुतळी बॉम्ब घेऊन आले आहेत. ते काहीतरी गडबड करतील, त्यांना तिथेच दाबायचं आणि गपचूप पोलिसांच्या हवाली करायचं.

### काय म्हणाले लक्ष्मण हाके?

या सभेत बोलताना अनेक नेते उपस्थित होते. मनोज जरांगे यांच्यावर यावेळी जोरदार टीका करण्यात आली. लक्ष्मण हाके यावेळी बोलताना म्हणाले, भुजबळ साहेब आणि धनंजय मुंडे यांची जोडी व्यासपीठावर बघून आज स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची आठवण झाली. गोपीनाथ मुंडे यांनी जातीनिहाय जनगणना करावी या मागणीसाठी दिल्लीतील संसदेत आवाज उठवला होता. आपण बीड जिल्ह्यात सर्वजण उपस्थित आहात, भुजबळ साहेब इथे दोन दिवस झाले सांगितले जात होते की भुजबळांना बीडमध्ये येऊ देणार नाही. भुजबळ साहेब तर लांब त्यांच्या कार्यकर्त्यांच्या केसाला सुद्धा धक्का लाऊ शकत नाहीत.

### राज्यातला मागासवर्ग आयोग बंद करा

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, मी एक जीआर घेऊन आलो आहे, त्यातले एकच वाक्य मी वाचून दाखवतो. हा जीआर ओबीसींचे आरक्षण संपवणारा आहे. त्यात असे लिहिले आहे, मराठा समाजास जात प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रक्रियेत अधिक सुलभता यावी यासाठी शासन निर्णय घेत आहे. छगन भुजबळ साहेब तुम्ही सरकारमध्ये आहात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगा राज्यातला मागासवर्ग आयोग बंद करा. दुसऱ्यांदा सांगा की सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाचे सामाजिक मागासलेपण नाकारले आहे. औरंगाबाद खंडपीठाने मराठा समाज आणि कुणबी एकच असल्याचे मानणे नाकारले आहे. त्यामुळे सरकारने जो जीआर काढला आहे, तो सर्वोच्च न्यायालयाचा अपमान करणारा आहे.

### मनोज जरांगे चौथी नापास

लक्ष्मण हाके पुढे म्हणाले, हा जीआर म्हणजे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीमध्ये घुसवण्याचा प्रयत्न आहे. माझी तुम्हाला हात जोडून कळकळीची विनंती आहे, एका चौथी नापास माणसाच्या सांगण्यावरून या महाराष्ट्रातल्या ओबीसीच्या आरक्षणात माती कालवण्याचे काम इथल्या लोकनियुक्त सरकारकडून झाले आहे. हा जरांगे कोणावर टीका करतो छगन भुजबळ साहेबांवर करतो, धनंजय मुंडेंवर करतो. हा चौथी नापास गडी. मुख्यमंत्र्यांची आई-माय काढणारा हा माणूस. ज्या लोकांनी आमच्या आरक्षणाला विरोध केला त्यांना आम्ही घरी बसवले.

### आरक्षण म्हणजे गरीबी हटावचा कार्यक्रम नाही

ओबीसीचे आरक्षण पाहिजे असेल तर तुम्हाला ओबीसीमध्ये जन्माला यावे लागेल. आमच्या चार पिढ्यांनी सामाजिक दुजाभाव भोगला आहे. आमच्या लोकांना ऊस तोडावा लागतोय. आरक्षण म्हणजे गरीबी हटावचा कार्यक्रम नाही. आरक्षण म्हणजे सामाजिक प्रतिनिधीत्वाचा कायदा आहे. किती संविधान सांगायचे आता? असा सवाल हाके यांनी उपस्थित केला. आमचे म्हणणे आहे मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण देऊ नका.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ ऑक्टोबर २०२५


## कन्नड तालुक्यातील बालखेडा येथे होणार आठवा राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव



**कन्नड : (प्रतिनिधी )** कन्नड तालुक्यात वाङ्मयीन चळवळ अधिकाधिक बळकट व्हावी, नवोदित लेखक - कवी , वाचक घडावेत आणि वाचन संस्कृती रुजावी तसेच नवप्रतिभावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या प्रमुख उद्देशाने तालुक्यातील ग्रामीण भागात दरवर्षी त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ आणि भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने जानेवारीत राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. आठवा राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव या वर्षी बालखेडा येथे संपन्न होणार असून या महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी प्रसिद्ध कवी, तिफण चळवळीचे मार्गदर्शक ,प्रगतशिल शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्ते अशोकसिंग किसनसिंग शेवगण यांची निवड करण्यात आली आहे. हतनूर येथे झालेल्या तिफण लेखक वाचक मेळाव्यातच त्यांनी हे यजमानपद स्विकारल्याचे जाहीर केले होते. या कविता महोत्सवात राज्यभरातील मान्यवर व नवोदित कवी, कवितेचे अभ्यासक आणि काव्यरसिक , वाचक सहभागी होतात. बालखेडा हे गाव करंजखेड, नेवपूर पूर्णा धरणाजवळ असून निसर्गरम्य असा परिसर आहे. किल्ले अंतुर , वाकी येथील शिवेश्वर संस्थान याच परिसरात आहेत तसेच करंजखेड येथील मराठवाडा मुक्तिसंग्रामातील क्रांतिवीर काकासाहेब देशमुख , त्यांचे सहकारी स्वातंत्र्य सेनानी राणा शिवसिंह शेवगण यांचे हे गाव आहे. गावाजवळच टेकडीवर गणेश मंदिर आहे. प्रथमच या गावात असा कविता महोत्सव होत असून हा परिसर पहाण्याची व अनुभवण्याची संधी कवींना व रसिकांना मिळणार आहे. स्वागताध्यक्षपदी अशोकसिंग शेवगण यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे स्वागत करण्यात आले. तिफण कविता महोत्सवाच्या कार्यक्रमाविषयी व नियोजना विषयी चर्चा करण्यात आली. हा महोत्सव दरवर्षी प्रमाणेच भव्यदिव्य करू असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे तिफण कविता महोत्सव संयोजन समितीचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. सिताराम जाधव, अ‍ॅड. कृष्णा जाधव, उत्तमराव राठोड, पी. एम. डहाके, सागर जाधव, युवा नेते गणेश घुगे , प्रा. योगेश सोमवंशी , प्रविण गोरे महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, संयोजन समितीचे डॉ.रामचंद्र झाडे , प्रविण दाभाडे, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, भिमराव सोनवणे, संदीप ढाकणे, मनोज खुटे, श्रीराम दापके, का. का. थोरात, शिवनाथ गायकवाड, अनिता राठोड, शुभदा देवरे, संदीप वाकडे, भरत सोनवणे, गितांजली गजबे, अजय दवंडे, अमोल मोकासे, समाधान निकम, आदिंनी अभिनंदन केले.

## जि.प.कन्या प्रशाला औरंगपुऱ्याच्या विद्यार्थ्यांनी पणत्या विक्रीतून जमा झालेली रक्कम दिली शाळासुधार निधीला




**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद कन्या प्रशाला औरंगपुरा येथील विद्यार्थ्यांनी मा.जिल्हाधिकारी श्री दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून दशसूत्री कार्यक्रमांतर्गत मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली छान सुबक अशा पणत्या तयार केल्या होत्या.

केंद्रीय प्राथमिक शाळा सातारा आणि शिक्षणाधिकारी कार्यालय या ठिकाणी पणत्यांची विक्री केली त्या विक्रीतून मुद्दल जाऊन १७९० हा निव्वळ नफा जमा झाला. या नफ्यातून स्वकष्टा ची जाणीव विद्यार्थी यांना व्हावी म्हणून मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी २५ रुपये नफ्याची रक्कम दिली.

परंतु त्यांना खाऊसाठी देण्यात आलेली रक्कम अनेक विद्यार्थ्यांनी पुन्हा शाळा सुधार निधीसाठी देण्याचा मनोदय ठेवला.त्यांच्या या कृतीस सर्व शिक्षकांनी कौतुकाची थाप दिली.

सर्व विद्यार्थ्यांनी हा निधी शाळा सुधारण्यासाठी घेण्यात यावा जेणेकरून प्रशालेतील शैक्षणिक गरजांसाठी हा पैसा वापरता येईल याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक कृष्णा शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे वर्ग शिक्षीका

## राज्यस्तरीय विज्ञान गाणित ज्ञानशोध परिक्षेत समृद्धी हंसराज भोसले राज्यात ११ व्या स्थानावर

**उमरगा (प्रतिनिधी ) :** मिलीया कॉलेज बीड येथे ०५ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या १४ व्या राज्यस्तरीय ऑनलाईन भौतिकशास्त्र व गणित विषयज्ञान परिक्षेत तालुक्यातील श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथील १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

भौतिकशास्त्र आणि इलेक्ट्रानिक्स विभागातर्फे विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय परिक्षेत सहभाग घेवून या परिक्षेचे महत्व सांगण्यात आले. अशा परिक्षा दिल्यामुळे आपल्या विषयज्ञानाची खोली कितपत आहे तसेच प्रत्येक प्रश्नाचे स्वरूप हे निश्चित कळून एक आपल्याकडे वेगळा अनुभव प्राप्त होत असल्यामुळे हाच अनुभव पुढील आयुष्यात यशस्वी होण्यासाठी उपयोगी ठरतो.

महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता त्यापैकी सर्वजण १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कु. समृद्धी हंसराज भोसले ही विद्यार्थीनी राज्यात ११ व्या स्थानावर आली आहे. या परिक्षा दोन भागात पार पडल्या असून पहीला भाग हा ५० बहुपर्यायी प्रश्न आणि दुसरा भाग मौखिक विषयज्ञान असे स्वरूप होते.

सदरील राज्यस्तरीय परिक्षा ही ऑनलाईन असल्यामुळे कांही तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागला, तरी विद्यार्थ्यांनी आपल्या विषयावर बरेच प्रश्नाची मांडणी आपल्या शब्दात व्यक्त केली, या परिक्षेसाठी महाविद्यालयातील परिक्षा संयोजक म्हणून प्रा. डॉ अतुल बिराजदार व प्रा. डॉ. प्रविण गायकवाड यांनी काम पाहीले.

या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. अमोल मोरे व उपाध्यक्ष श्री. अश्लेष मोरे , प्राचार्य डॉ. संजय अस्वले, डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, प्रा. भास्कर लबडे विभागप्रमुख भौतिकशास्त्र विभाग तसेच प्रा. डॉ. अशोक पद्मपल्ले प्रभारी प्राध्यापक यांनी सहभागी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ ऑक्टोबर २०२५


## इकरा पब्लिक शाळेचा अबूजर जलाल राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ; शिस्त आणि परिश्रमाचे यश



**जळगाव (प्रतिनिधी):** नुकत्याच विभागस्तरीय शालेय कॅरम क्रीडा स्पर्धा नाशिक येथे संपन्न झाली त्यात इकरा पब्लिक शाळेतील अबूजर जलाल याने पुन्हा एकदा आपल्या कौशल्याच्या जोरावर उत्कृष्ट यश संपादन केले आहे.

या विद्यार्थीने विभागीय स्तरावर विजय मिळवून राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.नाशिक विभागातून अनेक स्पर्धक सहभागी झालेल्या या स्पर्धेत अबूजर शेख जलाल (वर्ग 8वी),या प्रतिभावान विद्यार्थ्याची निवड झाली.

या खेळाडूने अचूक खेळ,एकाग्रता आणि उत्कृष्ट रणनीतीचे दर्शन घडवले.कठीण प्रतिस्पर्धकांशी लढत त्याने आपल्या शांत व आत्मविश्वासपूर्ण खेळाने परीक्षकांचे आणि प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ.अ.करीम सालार यांनी अबूजरचे अभिनंदन करताना सांगितले की, शिस्त,परिश्रम आणि संघभावना या मूल्यांच्या आधारे इकरा पब्लिक विद्यालयातील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात उत्तम यश मिळवत आहेत.

संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.इकबाल शाह, सचिव एजाज मलिक, प्राचार्य शेख शकील, उप.प्राचार्य मोहसीन खान, क्रीडा शिक्षक आमीर खान तसेच सर्व शिक्षकवर्गाने या विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

विद्यालयाचे विद्यार्थी केवळ शैक्षणिकच नव्हे,तर क्रीडा क्षेत्रातही सातत्याने यश मिळवत आहेत, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे,असे त्यांनी सांगितले.

या यशाने विद्यालयाचा क्रीडा क्षेत्रातील लौकिक अधिक उजळला असून,अबूजर आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही उत्कृष्ट प्रदर्शन करील,असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## दिवाळीचा सण

दिवाळीचा सण
आनंदाची उधळण
स्वागतास सज्ज
दारी तोरण

दिवाळीचा सण
पहाटे मंगल स्नान
सुगंधी तेल उटणे
प्रसन्न करी मन

दिवाळीचा सण
उजळले तन मन
मनोभावे करीती
घरोघरी लक्ष्मीपूजन

दिवाळीचा सण
बहीण बसली नटून
भावाला ओवाळायला
आतुरले किती मन

दिवाळीचा सण
प्रेमाची देवाण-घेवाण
दिव्यादिव्यातून
एकतेची शिकवन

**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

एम.जे. न्यूज युटूब

## परतीच्या पावसाने

परतीच्या पावसाने
किती धिंगाणा घातला
ऐन दिवाळी सणाला
जसा मुक्कामी थांबला..

उभी रानातील मका
रानातचं रे भिजली
अन् बाजरी पडून
मातीतून उगवली..

चारा गेला रे वाहून
अन् काही रे सडून
मुके जीव उपाशीच
आज थकले रडून..

पाण्यातच रे सडली
कैरी आज कपाशीची
दिवा रानात लावण्या
कुठे वात कापसाची?

पीक पिवळे पडले
जसा फेरा काविळाचा
ऊन दिसेना अंगणी
जरी सण दिवाळीचा..

आता नको रे पावसा
असे अवेळी चोचले
माझ्या बळीच्याच भाळी
कसे लिहिले दिवाळे?

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
**मो.९४०३३८४८८९**

# निधन वार्ता



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – सौ.शांताबाई श्रीकिशनलाल जयसवाल (९३) गंगापूर निवासी यांचे येथील राहत्या घरी निर्वाण झाले.

त्यांच्या मागे पती, मुलं विजयशेठ, जुगलशेठ, दीपकशेठ व कन्या पुष्पादेवी भारतलाल जयसवाल तथा नातवंडांचा परिवार आहे.

अंत्यसंस्कार कांचनवाडी स्मशानभूमी येथे झाले.



चं.गो.मुंदडा हायस्कूल, सिरसम (बु.) येथे मुख्याध्यापक पदी राठोड व्ही.के. सर यांची नेमणूक करण्यात आली.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ ऑक्टोबर २०२५

# डिप्रेस्ड क्लास मिशन : अस्पृश्यतेविरुद्धची सामाजिक लढाई

१८ ऑक्टोबर १९०६ रोजी स्थापन झालेल्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ने भारतीय समाज सुधारणा चळवळीत एक ऐतिहासिक टप्पा निर्माण केला. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या संस्थेचा मुख्य उद्देश अस्पृश्यता निर्मूलन, दलित समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी कार्य करणे हा होता. त्या काळातील भारतीय समाज गहन जातीभेद आणि अस्पृश्यतेच्या अंधश्रद्धेच्या कचाट्यात होता. बहुतेक दलित लोकांना मुलांना शिक्षण मिळत नसे, रोजगाराच्या संधी अत्यल्प होत्या आणि समाजातील समानतेचा विचार जवळपास अस्तित्वातच नव्हता. या पार्श्वभूमीवर 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना समाजातील प्रगतिशील विचारसरणी आणि सामाजिक न्यायाची गरज लक्षात घेऊन झाली.'डिप्रेस्ड क्लास मिशनच्या स्थापनेसाठी 'प्रार्थना समाज' आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरला. १९०७ मध्ये 'पारेल' येथे पहिली शाळा सुरू करून मिशनने दलित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी दिली. शिक्षणाद्वारे समाज बदलण्याचा हा प्रयत्न त्या काळात अत्यंत धाडसी मानला जात होता. शिक्षण ही केवळ ज्ञान मिळवण्याची संधी नव्हती, तर समाजातील आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्याचे महत्त्वाचे साधनही ठरले. मुलांना मिळालेल्या शिक्षणामुळे त्यांचा आत्मसन्मान वाढला आणि समाजातील अन्य लोकांबरोबर समानतेचा अनुभव त्यांना लाभला.'डिप्रेस्ड क्लास मिशन'चे उद्दिष्ट केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते; सामाजिक सुधारणा, आर्थिक सक्षमीकरण आणि धार्मिक समता या क्षेत्रातही मिशनने ठोस काम केले. अस्पृश्यतेविरुद्ध जनजागृती करण्यासाठी विविध सभा, चर्चासत्रे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले गेले. लोकांना सामाजिक समतेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला गेला. समाजातील जुनाट रूढी, जसे की अस्पृश्यतेवर आधारित छळ, जातीव्यवस्थेतील असमानता आणि स्त्रियांवरील भेदभाव, यांचा विरोध करण्यासाठी मिशनने ठोस पावले उचलली.शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी ही मिशनची अत्यंत महत्त्वाची बाजू ठरली. दलित मुलांना शिक्षण देऊन नोकरी व आर्थिक संधी उपलब्ध करून देणे तसेच समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे हे मिशनचे प्राथमिक उद्दिष्ट होते. मिशनच्या शाळांमध्ये मुलांना केवळ पारंपरिक शिक्षणच नव्हे, तर सामाजिक मूल्ये, मानवाधिकार, आत्मसन्मान आणि समानतेचा संदेश दिला जात असे. या शाळांमुळे दलित मुलांचा आत्मविश्वास वाढला आणि समाजातील इतर वर्गांसोबत त्यांचा समन्वय सुधारला.आर्थिक सक्षमीकरण हे मिशनचे आणखी एक महत्त्वाचे अंग होते. दलित समाजातील लोकांना व्यवसाय प्रशिक्षण, हस्तकला, आणि इतर कौशल्ये शिकवून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या. यामुळे आर्थिक स्थिती सुधारली तसेच समाजातील आत्मसन्मान आणि स्वावलंबनाची भावना विकसित झाली. आर्थिक सक्षमीकरणामुळे दलित समाजातील लोकांनी आपले हक्क सुरक्षित करण्यास प्रोत्साहन मिळाले आणि सामाजिक भेदभावाविरुद्ध उभे राहण्याची क्षमता वाढली.धार्मिक समता ही मिशनची आणखी एक महत्त्वाची भूमिका ठरली. धर्मांच्या नावाखाली होणाऱ्या भेदभावाला विरोध करून सर्व धर्मांमध्ये समानता प्रस्थापित करण्याचा संदेश मिशनने दिला. मिशनच्या कार्यामुळे समाजात धार्मिक समतेविषयी जागरूकता वाढली आणि दलित समाजाला सामाजिक न्यायाच्या मार्गावर टाकण्यास मदत झाली.समाजावर मिशनच्या कार्याचा खोल परिणाम दिसून आला. शिक्षणामुळे दलित मुलांना उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाल्या, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा झाली. सामाजिक जनजागृतीमुळे अस्पृश्यता विरोधी चळवळींना चालना मिळाली आणि समाजातील वाईट रूढी, भेदभाव व असमानतेवर खुलासा झाला. आर्थिक सक्षमीकरणामुळे दलित समाजाचे व्यक्ती स्वावलंबी झाले आणि त्यांनी समाजातील निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. धार्मिक समतेच्या प्रचारामुळे समाजातील सामूहिक सहिष्णुता वाढली आणि भेदभावाच्या प्रथा कमी होऊ लागल्या.आजही 'डिप्रेस्ड क्लास मिशन'चे महत्त्व कमी झालेले नाही. स्थापनेपासून जवळपास ११८-११९ वर्षांनंतरही त्याचे उद्दिष्ट आणि कार्य समाज सुधारण्यासाठी प्रेरणास्त्रोत आहेत. शैक्षणिक संस्था, वाचनालये, सामाजिक कार्यक्रम आणि आरोग्य सेवा केंद्रे मिशनच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. मिशनच्या कार्यामुळे निर्माण झालेला सामाजिक वारसा आजच्या काळातही दलित समाजाच्या उन्नतीसाठी प्रेरणा देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ही केवळ सामाजिक संस्था नाही, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवणारा प्रबळ यंत्र आहे. अस्पृश्यतेविरुद्धचा संघर्ष, समाजातील समता, आर्थिक सक्षमीकरण आणि धार्मिक समतेसाठी केलेले प्रयत्न हे मिशनच्या सामाजिक कार्याचे मूळ आधार आहेत. दलित समाजाची उन्नती आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे मिशनचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे, जे आजही समाज सुधारणा चळवळीतील प्रेरक ठरते.डिप्रेस्ड क्लास मिशनच्या स्थापनेचा परिणाम केवळ शिक्षणापुरता मर्यादित नसून सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रातही खोलवर पडला. दलित समाजाच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, आत्मसन्मान वाढवण्यासाठी, आणि समाजातील असमानता कमी करण्यासाठी मिशनचे कार्य अद्वितीय ठरले. आजही या मिशनच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या शाळा, व्यावसायिक प्रशिक्षण संस्था आणि सामाजिक कार्यक्रम दलित समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देत आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, डिप्रेस्ड क्लास मिशनने भारतीय समाजात जातीय असमानतेविरुद्ध एक ठोस यंत्र तयार केले. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक जागरूकता आणि धार्मिक समतेवर आधारित या यंत्रामुळे समाजातील दलित समाजाला स्वतःचे हक्क मिळवण्याची क्षमता प्राप्त झाली. यामुळे समाजात समानतेवर आधारित नवे धोरण आणि विचारसरणी रुजली, जी आजही कार्यरत आहे.निष्कर्षतः, डिप्रेस्ड क्लास मिशन ही सामाजिक परिवर्तनाची प्रेरक संस्था आहे. अस्पृश्यतेविरुद्धचा संघर्ष, दलित समाजाची उन्नती, आणि समाजातील समानतेसाठी केलेले प्रयत्न हे मिशनचे मूलभूत ध्येय आहेत. १८ ऑक्टोबर रोजी या मिशनचा स्थापना दिन साजरा करून समाजातील समानतेची आणि सामाजिक न्यायाची जाणीव वाढवणे आवश्यक आहे. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या कार्यामुळे दलित समाजाच्या उन्नतीसाठी स्थिर पाया रचला गेला आहे आणि आजही त्याचा सामाजिक वारसा समाजात उजळून दिसतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
ईमेल –
bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103